Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

CURRENT GLOBAL REVIEWER

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

# CURRENT GLOBAL REVIEWER

**Half Yearly**

Issue X Vol IV , April. 2020 | **Peer Rewied** | **ISSN : 2319 - 8648** **Impact Factor :7.139**


Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# Index


| Sr. No. | Article Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Regular Exercise: A Need of Time | Dr.Nirajkumar N. Uplanchwar | 1 |
| 2 | Study The Problems Of Marginalized Groups And Role Of The Organizations To Cope Up With Hiv (With special reference to NACO – NACP Phase) | Dr. Girija Ranasing<br>Manju Thakur<br>Dr.BabasahebKokate | 4 |
| 3 | खरगोन जिलेमें लाल मिर्चव्यवसाय में कार्यशील पूँजी काविश्लेषणात्मक अध्ययन | विष्णुप्रसाद बैसवार<br>डॉ दिनेष अग्रवाल | 8 |
| 4 | स्त्री सबलीकरण काळाची गरज | डॉ.एस.पी. गायकवाड | 12 |
| 5 | पेशवेकालीन न्यायमुर्ती राम शास्त्री प्रभुने | डॉ. एन. जी. भद्रे | 16 |
| 6 | आयसीटी साधनसामुग्री आर्टस् ,कॉमर्स आणिसायन्स कॉलेज-कराड आणि पाटण तालुका: एक अभ्यास | प्रा. अनिल शिवाजीपाटील | 19 |
| 7 | स्वातंत्र्याचा जाहिरनामा : केसमुत्तिसुत्त | डॉ. बालाजी मा. गव्हाळे | 31 |
| 8 | साहित्यरत्न अण्णाभाऊसाठे यांचेकादंबरीलेखन | प्रा.डॉ.नारायण शिवशेट्टे | 35 |
| 9 | आपत्ती व्यवस्थापन व मानवी हक्काचा जाहीरनामा | प्रा. डॉ. अशोक जाधव | 39 |
| 10 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर 20 व्या शतकातील एक प्रज्ञावंत समाजसुधारक व राजकारणी | डॉ. ए .एन. सिद्धेवाड | 45 |

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta. Sonpeth Dist. Parbhani

CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly
Issue X Vol IV, April. 2020
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

# आपत्ती व्यवस्थापन व मानवी हक्काचा जाहीरनामा

प्रा. डॉ. अशोक जाधव
लोकप्रशासन विभाग, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ, जि. परभणी

**प्रस्तावना :**

पहिल्या व दुसऱ्या जागतिक महायुध्दातील अपरिमित मानवी व वित्त हानीमुळे जगातील अनेक राष्ट्र एकत्र येऊनच मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी विविध आंतरराष्ट्रीय संघटना, करार करण्यास पुढे आले. यातूनच जागतिक स्तरावर मानवी हक्क आयोग, कायदा यासारख्या बाबी निर्माण होण्यास व त्याला महत्त्व प्राप्त होण्यास सुरुवात झाली. परंतु यामध्ये एक बाब महत्त्वाची आहे की, मानवी हक्कांचे संरक्षण करण्याच्या कार्याची जाणीव ही मानवावर आलेल्या संकटामुळेच झाली हे मात्र खरे आहे. म्हणजेच मानवी हक्क व आपत्ती याचा फार जवळचा संबंध आहे. त्यामुळेच प्रस्तुत लघु शोधनिंबंध अभ्यासला जात आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

- जागतिक मानवी हक्काचा जाहिरनामा याचा अभ्यास करणे.
- आपत्ती व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.
- मानवी हक्क व आपत्ती व्यवस्थापन याचा सहसंबंध अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके :**

- मानवाच्या संरक्षणासाठी मानवी हक्क आयोगाची निर्मिती करण्यात आली.
- आपत्ती व्यवस्थापनामुळे मानवी हक्कांचे संगोपन होते.
- मानवी हक्कांचे हनन हे संकटकालिन किंवा आपत्ती काळात होते.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत लघुशोधनिबंधासाठी सामाजिकशास्त्रातील विवरणात्मक व विश्लेषणानात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. यामध्ये तथ्यसंकलन करताना संदर्भसाहित्य, विविध मासिके, साप्ताहिक व जिवनचरित्राचा अधार घेण्यात आला आहे.

**आपत्ती प्रशासनाचा अर्थ :**

आपत्ती प्रशासन हा शब्द आपत्ती व प्रशासन या दोन शब्दापासून बनलेला ओ. आपत्तीला इंगजीमध्ये Disaster असे म्हटले जाते. Disaster हा शब्द मूळ फ्रेंच भाषेतून आला आहे. जो Distastar या शब्दापासून बनला आहे. Dis म्हणजे bad (ताईट) अणि A star म्हणजे बदल होय. यावरुन आपत्ती म्हणजे नैसर्गिक किंवा मानवी शक्तीमुळे साधारण परिस्थितीमध्ये एकाकी आलेला विनाशकारी बदल होय. Oxfard शब्दकोषानुसार आपत्ती म्हणजे आढावलेले मोठे दुर्दैवी संकट होय.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



**आपत्ती व्यवस्थापनाची व्याख्या :**

**डॉ. नरेंद्र जाधव :**

आपत्ती येण्यापूर्वी ती येऊ नये यासाठी पूर्व तयारी करणे, ती आलीच तर कमीत कमी नुकसान होईल याची काळजी घेणे व आपत्ती नंतर जीवितांचे व वस्तूचे योग्य पूनर्वसन करणे होय.

आपत्ती पूर्व, आपत्ती आल्यास व आपत्ती नंतर सामुहिकपणे केलेली सकारात्मक कृती किंवा व्यवस्थापन म्हणजे आपत्ती प्रशासन होय.

**मानवी हक्काचा सार्वत्रिक जाहीरनामा :**

मानवी हक्क सार्वत्रिक जाहीरनाम्यातील ३० कलमांचे वर्णन करताना प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिध्द हक्क असलेल्या प्रमुख हक्क व स्वातंत्र्याची थोडक्यात माहिती देते. पहिली दोन कलमे सर्व मानवी हक्कांखाली असलेली मूलभूत तत्त्वे आहेत. ३ ते ११ कलमांमध्ये नागरी व राजकीय हक्कांचा समावेश आहे. २२ ते २७ कलमे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांविषयी सांगतात. शेवटची तीन कलमे एकतेची रचना पुरवितात, जी सर्व मानवी हक्कांच्या सार्वत्रिक उपभोगाला सुरक्षित ठेवते.

कलम १ : हक्कांमध्ये आणि प्रतिष्ठेत स्वातंत्र्य आणि समतेचा हक्क.

कलम २ : सापेक्षतेपासून मुक्ती.

कलम ३ : व्यक्तीला जीवन, मोकळीक आणि सुरक्षेचा हक्क.

कलम ४ : गुलामगिरी व दास्यत्वापासून स्वातंत्र्य.

कलम ५ : छळवणूक किंवा मानहानिकारक वागणुकीपासून स्वातंत्र्य.

कलम ६ : कायद्यासमोर एक व्यक्ती म्हणून अधिकृत मान्यतेचा हक्क.

कलम ७ : कायद्यासमोर एकसमान योग्यतेचा हक्क.

कलम ८ : कार्यक्षम न्यायसभेमार्फत उपाय मिळविण्याचा हक्क.

कलम ९ : जुलमी कैद किंवा हद्दपारीपासून स्वातंत्र्य.

कलम १० : न्याय सुनावणी किंवा सार्वजनिक सुनावणीचा हक्क.

कलम ११ : दोषी सिध्द होईपर्यंत निरपराध मानले जाण्याचा हक्क.

कलम १२ : एकांतात ढवळाढवळ करण्यापासून स्वातंत्र्य यात घर, कुटुंब व पत्रव्यवहा यांचा समावेश आहे.

कलम १३ : हालचालीच्या स्वातंत्र्याचा हक्क आणि स्वतःच्या देशात घर असण्याचा आणि हवे तेव्हा येण्याताण्याचा हक्क.

कलम १४ : सुरक्षित आश्रयस्थानाचा हक्क.

कलम १५ : राष्ट्रीयत्वाचा हक्क आणि ते बदलण्याचे स्वातंत्र्य.

कलम १६ : विवाह व कुटुंबाच्या संरक्षणाचा हक्क.

कलम १७ : मालमत्तेवर मालकी असण्याचा हक्क.

कलम १८ : श्रध्दा आणि धर्मासंबंधित स्वातंत्र्य.

कलम १९ : अभिप्राय आणि माहितीचे स्वातंत्र्य.

कलम २० : शांततापूर्ण सभा आणि संगतीचा हक्क.

कलम २१ : शासनात आणि मुक्त मतदानाचा सहभागी होण्याचा हक्क आणि सार्वजनिक सेवेला समान सवलती.

कलम २२ : सामाजिक सुरक्षिततेचा हक्क.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Sonpeth Dist.Parbhani

कलम २३ : काम करण्याचा व न्याय्य वेतन मिळविण्याचा हक्क.

कलम २४ : विश्रांती आणि फुरसतीचा हक्क.

कलम २५ : आरोग्य व सुस्थितीसाठी पुरेशा राहणीमानाचा हक्क.

कलम २६ : शिक्षणप्राप्तीचा हक्क.

कलम २७ : जमातीच्या सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा हक्क.

कलम २८ : मानवी हक्कांची हमी देणाऱ्या सामाजिक सुव्यवस्थेचा हक्क.

कलम २९ : व्यक्तीच्या संपूर्ण व स्वतंत्र व्यक्तिगत विकासासाठी, जमातीप्रती जबाबदार असण्याची आवश्यकता.

कलम ३० : राज्यापासून स्वातंत्र्य किंवा वरीलपैकी कोणत्याही हक्कांमधील ढवळाढवळीपासून स्वातंत्र्य.

**आपत्ती व्यवस्थापन व मानवी हक्क :**

वरील मानवी हक्काचा जाहीरनामा व आपत्ती व्यवस्थापनाच्या अर्थावरून असे निदर्शनास येते की, या दोन्ही संकल्पना व त्यांचे कार्य मानवी हिताला अनुसरून आहे. जाहीरनामात्यातील काही कलमांमध्ये आपत्ती काळामध्ये व आपत्तीनंतर मानवी हक्क आयोगाच्या माध्यमातून नागरिकांच्या पुर्नवसन व त्यांच्या मुलभूत गरजा पूर्ण होण्याची काळजी घेतली जाते. जाहीरनाम्यातील कलम १३ व १४ नूसार स्वतःच्या देशात घर असण्याचा आणि हवे तेव्हा येण्याजाण्याचा हक्क, सुरक्षित आश्रयस्थानाचा हक्क. तसेच कलम २२ ते २८ मध्ये सामाजिक सुरक्षिततेचा हक्क, काम करण्याचा व न्याय्य वेतन मिळविण्याचा हक्क, विश्रांती आणि फुरसतीचा हक्क, आरोग्य व सुस्थितीसाठी पुरेशा राहणीमानाचा हक्क, शिक्षणप्राप्तीचा हक्क, जमातीच्या सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा हक्क, मानवी हक्कांची हमी देणाऱ्या सामाजिक सुव्यवस्थेचा हक्क. याच्या माध्यमातून आपत्ती काळात मानवी हक्कांचे संरक्षण करण्याचे कार्य शासन, सेवाभावी संस्था व व्यक्तीद्वारे करण्यात येते. थोडक्यात मानवी हक्क आयोग आपत्ती काळात महत्त्वाची भूमिका बजावताना दिसून येते.

**संदर्भग्रंथ सूची :**

- प्रा. सुभाष भिंगे गौरव ग्रंथ, लोकप्रशासनातील नवे विचारप्रवाह, अरुणा प्रकाशन, लातूर.
- मोहित भट्टाचार्य, लोकप्रशासन के नये आयाम, जयपूर प्रकाशन, जयपूर-२००८
- डॉ. पचंशील एकबेकर, डॉ. दिपक वाघमारे, डॉ. विजय तरोडे, लोकप्रशासनातील नवप्रवाह, २०१०
- प्रा. जॉन्सन बोर्जस, संयुक्त राष्ट्र संघ आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
- डॉ. देवळाणकर शैलेन्द्र, समकालिन जागतिक राजकारण, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani